**वादीतर्फे साक्षीदार क्र. ०१ ची साक्ष**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

**उलटतपास प्रतिवादी क्र. २ ते ७, ९ व १० तर्फे विधिज्ञ श्री.एस.व्ही.धामापूरकर यांचेमार्फत शपथेवर सरू**

१४. माझे शिक्षण ५ वी पर्यंत झालेले असून मला लिहिता वाचता येते. हे मला माहित नाही की, दावा मिळकतींच्या ७/१२ मध्ये तुकडा असा शेरा असल्याने दावा मिळकतींचे वाटप करता येत नाही अशी प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी कैफियतीमध्ये हरकत घेतलेली आहे. मी प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी दिलेली कैफियत वाचलेली आहे. साक्षीदारास नि.क्र. ५ व ७ दाखल असलेले दावा मिळकतींचे ७/१२ दाखविण्यात आले. साक्षीदार नि.क्र. ५ व ७ पाहून सांगतो की, त्या ७/१२ वर तुकडा अशी नोंद आहे. हे म्हणणे खरे आहे की, कोर्ट कमिशनरने दाखल केलेल्या नकाशामध्ये स.नं. ४७ हि.क्र. १८ ही मिळकत संपुर्ण पाण्याखाली गेलेली आहे असे नमूद आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, ते चुकीचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमचे व कोर्ट कमिशनरची वाकडीक नाही. मला मोजणीचे ज्ञान नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोर्ट कमिशनच्या वेळेस दावा मिळकती अ.क्र. १ चा बहुतांशी भाग पाण्याखाली गेलेला होता असे कोर्ट कमिशनरच्या निदर्शनास आले होते.

प्रश्न – कोर्ट कहिमशनरच्या अहवालामध्ये नकाशामध्ये सर्व्हे नं. ४७ हि.क्र. २१ मध्ये निळया रंगाने पाण्याखाली गेलेला भाग दर्शविलेला आहे ?

उत्तर – निळया रंगाने दर्शविलेला भाग पुर्वीपासून पाण्याखाली गेलेला आहे.

१५. हे म्हणणे खरे आहे की, स.नं. ५१ हि.क्र. १६ मध्ये प्रतिवादी क्र. १ ते १० यांचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, स.नं. ४७ हि.क्र. २१ मध्ये प्रतिवादी क्र. १ ते १० यांची दोन घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, स.नं. ४७ हि.क्र. २१ मध्ये प्रतिवादींची जी दोन घरे आहेत ती जो हिस्सा पाण्याखाली गेलेला आहे त्या भागात नाहीत. हे म्हणणे खरे आहे

की, स.नं. ४७ हि.क्र. २१ चा जो भाग पाण्या खाली गेलेला नाही तो भाग प्रतिवादींच्या घरांनी व्यापलेला आहे.

मध्यंतराची वेळ झाल्याने साक्षीदाराचा उलट तपास तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/

एम.के.फकीह

दि. ३०/०७/२०२६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर मालवण.

**मध्यंतरानंतर साक्षीदाराचा पुढील उलट तपास प्रतिवादी क्र. २ ते ७, ९ व १० तर्फे विधिज्ञ श्री.एस.व्ही.धामापूरकर यांचेमार्फत शपथेवर सरू**

१६. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीमध्ये असलेले घर क्र. ९५७, ८२१ व ६१७ या घराकडे माझा व माझे वडीलांचा काहीही संबंध नसल्यामुळे आम्ही त्याचे वाटप या दाव्यात मागितलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. ११ ते १४ यांचा देखील घर क्र. ९५७, ८२१ व ६१७ यांच्याशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरची घरे फार वर्षापुर्वी बांधलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदर घरे दावा दाखल करण्यापुर्वी बांधलेली आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी, माझ्या वडीलांनी किंवा प्रतिवादी क्र. ११ ते १४ यांनी सदर घरे बांधत असताना घर बांधणाऱ्यांना कधीही विरोध केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर घरे कधी बांधण्यास सुरवात केली व कधी पुर्ण केली ते मला माहित नसल्याने मी त्या घरांना विरोध केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी कायमस्वरुपी वास्को नवेवाडी गोवा दाव्यात नमूद पत्यावर राहत असल्याने मला घरे कधी बांधली यांची माहिती झाली नाही. हे म्हणणे खरे आहे की, वडीलोपार्जित घर प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी मोडून टाकलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी स्वतंत्र घर बांधलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी ज्या ठिकाणी वडीलोपार्जित घर होते त्या ठिकाणी

नवीन घर न बांधता दुसऱ्या ठिकाणी घर बांधलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी बांधलेल्या घरांना मी किंवा प्रतिवादी क्र. ११ ते १४ यांनी आर्थिक किंवा अन्य कोणत्याही प्रकारची मदत केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, देवबाग येथे माझे किंवा प्रतिवादी क्र. ११ ते १४ यांचे स्वतंत्र घर नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या कारणाने माझे देवबाग येथे येणे होत नाही.

१७. हे म्हणणे खरे आहे की, माझा व प्रतिवादी क्र. ११ व १२ यांचे आधारकार्ड, रेशन कार्ड व मतदार यादीमधील पत्ता हा दाव्यात नमूद पत्यावरील आहे. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यात नमूद पत्यावर आमचे कामयचे वास्तव्य आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा जन्म गोवा येथे झालेला आहे. माझा जन्म कोठे झाला हे दर्शविणारा जन्म दाखला मी अभिलेखावर दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे आहे की, माझे व प्रतिवादी क्र. १२ चे शिक्षण गोवा येथे झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ११ व १३ यांचे देखील शिक्षण गोवा येथे झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी व प्रतिवादी क्र. ११ व १२ हे नोकरी निमित्त गोवा येथे राहतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील देखील दाव्यात नमूद माझ्या पत्यावर राहत होते. माझे वडील शिओलिम म्हापसा राज्य गोवा येथे राहत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील शिओलिम म्हापसा राज्य गोवा येथे राहत असताना ड्रायव्हींगचा व्यवसाय करत होते.

प्रश्न – तुमचे वडील शिओलिममध्ये असताना त्यांचे पुर्ण कुटूंब तुम्ही मुले व त्यांची पत्नीसह राहत होते ?

उत्तर – कल्याणी व प्रभाकर हे आजी व आजोबासोबत देवबाग मोबारवाडी येथे राहत होते.

१८. हे म्हणणे खरे नाही की, कल्याणी व प्रभाकर हे आजी आजोबासोबत देवबाग येथे मोबारवाडी येथे राहत होते हे दाखविण्यासाठी माझ्याकडे पुरावा नाही. माझे वडील त्यांच्या वयाच्या ५५ व्या वर्षी मयत झाले आहेत. हे म्हण्णे खरे आहे की, माझ्या वडीलांनी शेती केली हे दाखविण्यासाठी माझ्याकडे पुरावा नाही. माझे वडील त्यांच्या वयाच्या १५ व्या वर्षापासून

शिओलिम म्हापसा येथे ड्रायव्हींगचा व्यवसाय करत होते. हे म्हणणे खरे आहे की, मी, माझ्या वडीलांनी किंवा प्रतिवादी क्र. ११ ते १४ यांनी दावा मिळकत क्र. १ व २ चे जमिन मालक बाळकृष्ण रामचंद्र परुळेकर वगैरे यांना खंड दिला असा पुरावा माझेकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत क्र. १ व २ मध्ये माझा, माझे वडीलांचा व प्रतिवादी क्र. ११ ते १४ यांचेसोबत जमिन मालकांशी कुळपणाचा करार झाला किंवा आम्हाला कूळ घोषित केले असा पुरावा माझ्याकडे नाही.

१९. प्रतिवादी क्र. १४ हिचे लग्न सन १९५० सालापूर्वी झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १४ ही लग्न झाल्यानंतर तिच्या सासरी म्हणजेच तारकर्ली येथे राहत होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १३ ही लग्न झाल्यानंतर मिठबाव तांबळडेग येथे राहण्यास होती. हे म्हण्णे खरे नाही की, माझ्या वडीलांनी वॅास्को बायना येथे स्वत:चे घर घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यात नमूद माझे व प्रतिवादी क्र. ११ व १२ यांच्या पत्यावरील घर हे माझे वडीलांनी घेतलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील शिओलिम येथे त्यांच्या भावंडापासून विभक्त होवून राहत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे चुलते रामचंद्र हे कायमस्वरुपी देवबाग येथे राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे चुलते रामचंद्र हे देवबाग येथे शेतीवाडी पाहत होते. हे म्हणणे खरे नाही की, माझे चुलते रामचंद्र हे दावा मिळकत क्र. १ व २ कसून जमिन मालक परुळेकर यांना खंड देत होते.

२०. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत अ.क्र. ३ मध्ये प्रतिवादी क्र. १ ते १० यांचे भलेमोठे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत क्र. ३ मध्ये प्रतिवादी क्र. १ ते १० यांची विहिर व संडास देखील आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत क्र. ३ ही प्रतिवादी क्र. १ ते १० यांचे घर, विहिर व संडासने व्यापालेली आहे.

२१. हे म्हणणे खरे आहे की, मी दि. २२ सप्टेंबर २०११ रोजी प्रतिवादीं क्र. १ कडे दावा मिळकतीचे वाटप मागितले असे घडले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि. २२ सप्टेंबर

२०११ रोजी माझे व प्रतिवादी क्र. १ चे काहीच बोलणे झालेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, रामचंद्र गुणाजी राऊळ हे नेमके कधी मयत झाले ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, भगवान गुणाजी राऊळ हे नेमके कधी मयत झाले हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, भगवान गुणाजी राऊळ हे सन १९५० पुर्वी मयत झाले. हे मला माहित नाही की, ज्या वेळेस भगवान गुणाजी राऊळ मयत झाले त्यावेळी माझे वडील २० वर्षाचे होते. हे म्हणणे खरे आहे की, दावा दाखल करण्याच्या दिवशी दावा मिळकत क्र. १ ते ३ हया प्रतिवादी क्र. १ ते १० यांच्या कब्जात होत्या. हे म्हणणे खरे आहे की, सध्या दावा मिळकत क्र. १ ते ३ हया प्रतिवादी क्र. २ ते ६ व ८ ते १० यांच्या कब्जात आहेत. हे म्हणणे खरे नाही की, भगवान गुणाजी राऊळ यांच्या मृत्यूनंतर दावा मिळकत अ.क्र. १ ते ३ या प्रतिवादी क्र. १ ते १० यांच्या कब्जात आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती गुणाजी राऊळ यांच्या पश्चात रामचंद्र यांच्या ताब्यात आली व रामचंद्रच्या पश्चात प्रतिवादी क्र. २ ते ६ व ८ ते १० यांच्या ताब्यात आली.

प्रश्न – तुमचा दावा मिळकत क्र. १ ते ३ याच्याशी काहीही संबंध नसल्याने तुम्ही प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी दावा मिळकतींमध्ये बांधलेल्या घरांना विरोध केला नाही ?

( सदर प्रश्नाला वादींचे वकील आक्षेप घेतला आहे. श्री.एस.एस.गवाणकर यांचे असे म्हणणे आहे की, दोन प्रश्नाला जोडून एक प्रश्न विचारण्यात आलेला आहे. घराबद्दल प्रश्न वेगळा विचारला पाहिजे व जमिनीबद्दल वेगळा प्रश्न विचारला पाहिजे. तसेच प्रतिवादींचा जमिन मिळकतीमध्ये प्रतिवादींचा हक्क नाही असे गृहित धरुन पुढील प्रश्न विचारण्यात आलेला आहे. त्यामुळे साक्षीदार एकाच उत्तराने दोन प्रश्नाची उत्तरे देवू शकणार नाही. त्यामुळे प्रश्न फोडून विचारण्याची विनंती केली. याउपर प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, साक्षीदाराने अगोदरच प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी बांधलेल्या घरांना विरोध केलेला नाही असे मान्य केलेले आहे. सदरचा प्रश्न हा का विरोध केला नाही कारण जमिनीमध्ये वादींचा हक्क नाही हे शाबीत करण्या करीता विचारलेला आहे. दोन्ही बाजूचां युक्तीवाद ऐकला. साक्षीदाराने प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी बांधलेल्या घरांकडे त्यांचा हक्क नाही म्हणून आक्षेप घेतला नाही असे मान्य केलेले आहे. प्रस्तुतचा प्रश्न हा घराबद्दल नसून जमिनीबद्दल आहे. सबब, वादींच्या वकीलांनी घेतलेला आक्षेप फेटाळण्यात येतो.

उत्तर – हे म्हणणे खरे आहे.

२२. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीकडे माझा कोणताही संबंध नसल्याने मी प्रतिवादीविरुध्द खोटा व खोडसाळ दावा दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे नहाी की, मी खोटया दाव्याच्या कथनाच्या पुष्ठयर्थ खोटे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/

एम.के.फकीह

दि. ३०/०७/२०२६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर मालवण.